# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६**

**दूरध्वनी ५६५६२३४ फॅक्स ५६५६२३४ E-mail : ropune.dte.@gmail.com**


---

अतितातडीचे

जा.क्र.विकापु/विवि/बैठक/२००९/ ५८८

दिनांक 19 JUN 2009

प्रति,

प्राचार्य,
पुणे विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या
अभियांत्रिकी / औषध निर्माण / वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट
केटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रम तसेच एम.बी.ए. /
एम. एम. एस. व एम. सी. ए. पदव्यूत्तर अभ्यासक्रम.

**विषय - रिट याचिका क्र २२१६/२००६ अन्वये राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांमध्ये प्राचार्य / संचालकांचे पद भरण्यांबाबत केलेली कार्यवाही. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आयोजित केलेली बैठक.**

संदर्भ - १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क २ एनजीसी/न्याप्र/२००८/दिनांक ९/६/२००९

२) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क २ एनजीसी/न्याप्र/२००९/४०३ दिनांक १८/६/२००९.

उपरोक्त विषयांस अनुसरुन संदर्भीय प्र क्र (१) व्दारे विहित प्रपत्रामध्ये आपल्याकडून माहिती मागविण्यांत आलेली होती. तथापि काही संस्थांकडून अद्यापही माहिती उपलब्ध झालेली नाही. संदर्भ पत्र क्र (२) च्या अनुषंगाने दिनांक २०/६/२००९ रोजी दुपारी ३.०० वाजता महाराष्ट्र राज्य इन्स्टि. ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, शिवाजीनगर पुणे या संस्थेच्या सभागृहात (तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे जवळ असलेली संस्था) बैठक आयोजित करण्यांत आलेली आहे. सदर बैठकीस येताना सर्व संस्थाप्रमुखांनी खालील प्रपत्रामध्ये माहिती न चूकता आणावयाची आहे. सदर माहिती सोबत प्राचार्याच्या नेमणूकीस विद्यापीठाची मान्यता असल्यास सदर पत्राची छायाप्रत देखील आणावयाची आहे. सदर बैठक ही अत्यंत महत्वाची आहे. दिनांक ३१/५/२००९ पूर्वी प्राचार्य / संचालकांचे पद न भरल्यास अशा संस्थांवर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यांत येणार असल्याने सदर बैठकीत अचूक आढावा योग्य त्या माहितीच्या आधारे घेणे आवश्यक आहे. आणि सदर आढाव्याअंती प्राप्त झालेली माहिती तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना दिनांक २२/६/२००९ पर्यंत पाठवावयाची असल्याने माहिती अचूक असावी याची सर्वांनी नोंद घ्यावी.

| अ क्र | व्यवस्थापन मंडळाचे व संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव व प्रवेशक्षमता अभियांत्रिकी/औषधनिर्माण शास्त्र /वास्तुशास्त्र/हॉमॅ ॲन्ड कॅ टे.पदवी अभ्यासक्रम तसेच एम बी ए/एमएमएस व एम सी ए पदव्यूत्तर अभ्यासक्रम | नियमित प्राचार्य/संचालकांचे नांव व नेमणूकीचा दिनांक | नेमणूकीस विद्यापीठाची मान्यता असल्यास विद्यापीठाच्या पत्राचा दिनांक | विद्यापीठ मान्यता नसल्यास पदे नियमित करणेबाबत संस्थेने केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

गो पं चौधरी

( गो पं. चौधरी )
प्र सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत - श्री शिंदे एस बी प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे, यांना कळविण्यांत येते की, सदर पत्र संकेत स्थळावर प्रदर्शित करावे.
प्रत - श्रीमती लोखंडे एन एन अधिव्याख्याता, यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी. त्यांना कळविण्यांत येते की, माहिती संकलीत करुन अचूकपणे संचालनालयास कळवावी.